# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०२/०७/२०१६.

**१) घरातुन सोन्याच्या दागिन्यांची चोरी. :—**

दिनांक १३/०६/०१६ ते दि. ०१/०७/०१६ रोजी ०९.०० वा. ते ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी आनंदराव बुधाजी नेवारे वय ५५ वर्ष, रा. वाही कॉलोनी पवनी हे त्यांच्या पत्नीसह कामानिमीत्त दिनांक १३/०६/२०१६ ला सकाळी ०९.०० वा. घराला कुलुप लावुन स्व:गावी गेले होते. दि. ०१/०७/२०१६ ला सकाळी ०७.३० वा. दर. त्यांना चोरी झाल्याचे माहीत झाल्यावरून ते घरी परत आले, तर त्यांना त्यांच्या घराच्या समोरील दाराचे कुलुप तोडून कोणीतरी अनोळखी चोराने आत प्रवेश करून लोखंडी आलमारी तोडुन आलमारी मध्ये ठेवलेला एक सोन्याचा गोप २० ग्रॅम, १ सोन्याचा मंगळसुत्र १० ग्रॅम, सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याच्या बि—या ३ ग्रॅम, सोन्याचे मणि ६ ग्रॅम व देवघरात ठेवलेले चिल्लर नाने १०००/—रु. असा एकुण कि. ६७,०००/—रु. चा माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,४५४,३८० भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. पोउपनि. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) बॅनर फाडल्याच्या वादावरून रॉडने मारून व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.**

दिनांक ०१/०७/२०१६ रोजी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी पुष्कर ग्यानीवंत कारंजेकर वय २३ वर्ष, रा. श्रीनगर कॉलोनी सेंदुरवाफा याने आरोपीचे बॅनर फाडल्याच्या वादावरून पटत नसल्यामुळे चारही आरोपीने संगनमत करून फिर्यादीच्या घरी जावुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीच्या खांदयावर रॉडने मारले व आरोपी क्र. २ याने तलवार मारण्यासाठी उचलली तसेच आरोपी क्र. ३ व ४ यांनी शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४४८,३२३,५०४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) हारवेस्टर मशिनचा धक्का लागल्याने महिला जखमी. :—**

दिनांक ०७/०५/२०१६ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी सुभाष रामचंद्र टेकाम वय ४५ वर्ष, रा. गराडा/जंगल यांनी त्यांच्या शेतातील धान कापण्याकरीता आरोपीची हारवेस्टर मशिन किरायाने आनुण आरोपी चालक हा शेतात धान कापीत असतांना त्याने लापरवाहीने, हयगयीने चालवुन हारवेस्टर मागे घेत असतांना हारवेस्टर मशिनचा धक्का फिर्यादीची पत्नी सौ. शिल्पाबाई वय ३५ वर्ष हीला लागुन तिच्या डाव्या पायाचे हाड मोडले. असे फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष**. भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ...